## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/व्यवस्थापनशास्त्र व एमसीए महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय / महोदया,

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २०१७-१८ व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाहभत्ता योजना २०१७-१८, या योजनांअंतर्गत समाविष्ट होण्यासाठी संबंधीत महाविद्यालय/तंत्रनिकतने यांनी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून स्वखर्चाने आधार संलग्नीत बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणाली स्थापीत करणे बंधनकारक असल्याबाबतचे प्र.सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे यांचे जा.क्र.:तंशिविकापु/विवि/ईबीसी/२०१७-१८/२०१७/२१४८, दि.०६/०६/२०१७ चे पत्र व त्यासोबतची सहपत्रे आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केली आहेत. सदरचे पत्र व सहपत्रे अवलोकनी घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व सदरची पत्रे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी.

आदेशान्वये,
I/Cउपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 43
दि.: 7 JUL 2017

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
☎ ०२०- २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com

जा. क्र. : तंशिविकापु/विवि/ईबीसी/२०१७-१८/२०१७/ 2148 दिनांक : ०६/०६/२०१७

प्रति,
संचालक /प्राचार्य
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत व
खाजगी विनाअनुदानीत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था.

Shivaji University, Kolhapur
Affiliation T.2
Inward No. 459
Date 16/06/17

विषय - राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २०१७-१८ व डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाहभत्ता योजना २०१७-१८.

संदर्भ — १. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/प्र क्र ५०१/तांशि-४ दिनांक १३/१०/२०१६.
२. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/प्र क्र ५५९/तांशि-४ दिनांक १५/०४/२०१७.
३. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/प्र क्र २०१९/तांशि-४ दिनांक ३१/०३/२०१६.

विषयांकीत दोन शासन योजनांचा विद्यार्थ्यांना लाभ देण्यसासाठी या विभागाच्या अधिनस्त संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून उपरोक्त योजनेतंर्गत करण्यात येणारी प्रतिपूर्ती संबंधीत महाविद्यालय / तंत्रनिकेतने यांना करण्याऐवजी पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती स्वरुपात थेट त्यांच्या आधार संलग्नीत बँक खात्यावर जमा करण्यात येणार आहे.

वरील दोन्ही योजनांसदर्भात संदर्भ क्र १ येथील शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अन्य सर्व अटी, शर्ती व निकष हे दोन्ही योजनांकरीता कायम राहतील तसेच या योजनेचा लाभ घेणा-या सर्व महाविद्यालय / तंत्रनिकेतनांना सदर योजनेअंतर्गत समाविष्ठ होण्यासाठी संस्थेतील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांची दैनंदीन उपस्थिती पारदर्शीपणे नोंदविणे आवश्यक आहे. यासाठी संबंधीत महाविद्यालय / तंत्रनिकेतने यांनी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून आधार संलग्नीत बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणाली स्थापीत करणे बंधनकारक आहे. उपरोक्त दोन्ही योजनांचा लाभ घेण्यासाठी संबधीत शैक्षणिक वर्षात इच्छुक अर्जदार विद्यार्थ्यांची प्रवेशीत अभ्यासक्रमासाठी किमान ५० टक्के उपस्थिती आधार संलग्नीत बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीवर विद्यार्थ्यांनी नोंदविणे आवश्यक आहे व विद्यापीठ /एआयसीटीई यांच्या प्रचलित नियमानुसार त्यांनी परीक्षांसारख्या अन्य विविध प्रयोजनार्थ विहीत केलेल्या उपस्थितीच्या प्रमाणाची स्वतंत्रपणे सर्व संबंधीत विद्यार्थ्यांनी पूर्तता करणे आवश्यक आहे.

Shivaji University, Kolhapur
Offg. Pro-Vice-Chancellor Office
Date :- 10 JUN 2017
Inward No.:- 3515
To Whom :-

या प्रयोजनार्थ महाविद्यालय / तंत्रनिकेतने यांनी ऑक्टोबर २०१७ पर्यंत स्वखर्चाने आधारे संलग्नीत बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणाली त्यांचे परिसरात स्थापित करणे बंधनकारक आहे.

**तसेच संदर्भ क्र ३ मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयानुसार या योजनांतर्गत पात्र असणा-या प्रवेशित विद्यार्थ्यांना सदर योजनांचा लाभ मिळणेसाठी व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या संबधीत शैक्षणिक संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर संस्थेकडून मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करणे आवश्यक आहे अन्यथा या संस्था शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून उपरोक्त शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहतील.** आता लवकरच शैक्षणिक वर्ष २०१७-१८ सुरु होत आहे. त्यामुळे आपल्या **शैक्षणिक संस्थेचे मुल्यांकन करुन घेण्यासाठी** २ वर्षाचा कालावधी शिल्लक आहे. या दोन वर्षाचे कालावधीत आपल्या संस्थेचे मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करुन घेण्याची जाणीव सर्व संस्थांना या पत्राव्दारे करुन **देण्यात येत आहे.**

सोबत - संदर्भिय **शासन निर्णयाच्या प्रती**

(डॉ. दि.रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत - मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांना माहितीस्तव सादर **(लक्षवेध कार्यसन क्र. १८)**

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक 1967, मुंबई - 400 001.
दुरध्वनी : 022-22617969 फॅक्स : 022-22690007
E Mail : desk18@dtemaharashtra.gov.in Website : dtemaharashtra.gov.in

रजि. एडी/ई-मेलव्दारे

क्रमांक : १८/ईबीसी/मुल्यां. व दर्जा माना./२०१७-१८/७७
दिनांक : ०५/०६/२०१७

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर,

विषय: खाजगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांतील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरु ठेवण्याबाबत.

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. टीईएम-२०१५/प्र.क्र.२०१९/तांशि-४, दि. ३१.०३.२०१६
२) उ. व तं. शि. विभागाचे शासन पत्र क्र. टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि. ३०.०५.२०१७

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरू ठेवण्याबाबत संदर्भाधिन शासन निर्णयान्वये शासनाने मान्यता दिली आहे. सदर शासन निर्णयातील अट क्रमांक १८ खालीलप्रमाणे आहे :-

" सदर योजनेंतर्गत पात्र असणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संबंधित शैक्षणिक संस्थांनी पुढील ३ वर्षाच्या आत म्हणजे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर संस्थेकडून मूल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करणे (Assesment Accreditation ) आवश्यक राहील. तदनंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधित शिखर संस्थाकडून मुल्यांकनं व दर्जा निश्चिती करून मुल्यांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांना मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त होईपर्यंत या योजनेतून वगळण्यात येईल व त्या वर्षापासून केवळ मानांकन प्राप्त करणाऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विसक्षार्थ्यांकरीताच सदर योजना लागू राहिल."

वरील अटीनुसार सर्व संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक संस्थांनी सक्षम शिखर संस्थांकडून मुल्यांकन व दर्जाचे मानांकन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत प्राप्त करून घेणे गरजेचे आहे, अन्यथा या संस्था शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून उपरोक्त शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहतील. आता लवकरच शैक्षणिक वर्ष २०१७-१८ सुरू होत आहे. त्यामुळे हया शैक्षणिक संस्थांना मुल्यांकन करून घेणेसाठी २ वर्षाचा कालावधी शिल्लक राहणार आहे. या २ वर्षाच्या कालावधीत हया शिक्षण संस्थांनी मुल्यांकन करून घेणे गरजेचे आहे. याची जाणीव आपण तातडीने सर्व संबंधित शिक्षण संस्थांना करून द्यावी. जेणेकरून, त्या संस्थांमध्ये शिकणाऱ्या सामाजिक मागास व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सदर शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीच्या लाभापासून वंचित ठेवता येणार नाही. सबब आपण योग्य ती कार्यवाही त्वरेने करावी व त्याप्रमाणे आपल्या नियंत्रणाखालील सर्व संस्थांना सूचना निर्गमित कराव्यात व याबाबत या संचालनालयास अवगत करावे.

(चंद्रशेखर ओक) भा. प्र.से.
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

१ प्रत :- डॉ. किरण पाटील, उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, यांना माहितीस्तव सादर.

Received by email,
5/6/2017

**खाजगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरु ठेवण्याबाबत...**

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. टीईएम -२०१५/प्र.क्र. २१९/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ३१ मार्च, २०१६.

वाचा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टीईएम -२०१४/ प्र. क्र. ९०/तांशि-४, दिनांक २०.०३.२०१५.

प्रस्तावना :

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि विभाग, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्याखाली असणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या खाजगी कायम विना अनुदानित संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या सामाजिक मागास व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थी केवळ निधीअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून वंचित राहू नये म्हणून, एक सामाजिक बांधिलकी व घटनात्मक उत्तरदायित्व म्हणून, राज्य शासनाने फी प्रतिपूर्ती करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून घेतलेला आहे. सदरहू निर्णय शैक्षणिक वर्ष २००७-०८, २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये कायम ठेवण्यात आलेला आहे. सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून सुरु ठेवण्याबाबतच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने दिनांक १७.०३.२०१६ च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये खालील सुधारणांसह मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे :-

१. मंत्रिमंडळ टिप्पणीतील परिच्छेद क्र. १४ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेत शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात यावी.

२. सदर योजनेच्या अंमलबजावणीस दरवर्षी मंत्रिमंडळाची मान्यता न घेता धोरण म्हणून सदर योजनेस मान्यता देण्यात यावी.

३. तथापि, सदर योजनेच्या अंमलबजावणी संदर्भातील सुधारीत पद्धतीचा पुढील शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी विभागाने सविस्तर आढावा घ्यावा.

४. तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक असलेला निधी सर्व संबंधित विभागांना प्रत्येक वित्तीय वर्षी अर्थसंकल्पीत करुन उपलब्ध करण्यास मान्यता असावी.

५. सदर योजनेचे मूळ निकष न बदलता अंमलबजावणीत सुधारणा करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना वित्त विभागाच्या सल्ल्याने प्रदान करण्यास मान्यता देण्यात यावी.

त्यानुसार सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुधारीत अटी व शर्तीनुसार सुरु ठेवण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

सदर निर्णयानुसार अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या समाज घटकांतील विद्यार्थ्यांची फी प्रतिपूर्ती करण्याबाबतचे आदेश सामाजिक न्याय विभागामार्फत आणि अनुसूचित जमाती या घटकातील विद्यार्थ्यांसाठी फी प्रतिपूर्ती करण्याबाबतचे आदेश आदिवासी विकास विभागाकडून तसेच आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या फी प्रतिपूर्तीचे आदेश हे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि विभाग, पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांमार्फत त्यांच्या अखत्यारितील संबंधित शैक्षणिक संस्थांमधील शासनाने निश्चित केलेल्या निवडक विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसंदर्भात शासन निर्णय निर्गमित करणे अपेक्षित आहे.

२. या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीची सन २००६-०७ पासून कार्यान्वित केलेली योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुधारीत अटी व शर्तीच्या अधीन राहून सुरु ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरु ठेवण्यास खालील सुधारीत अटींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

### पात्रतेचे निकषः-

(१) सदर योजना ही खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतनांसमवेत शासकीय व अनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठातील विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांनाही लागू राहील.

या योजनेमध्ये खालील अभ्यासक्रमांचा समावेश राहील :-

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए./एम.एम.एस. |
| औषधनिर्माणशास्त्र | औषधनिर्माणशास्त्र | एम.सी.ए. |
| एचएमसीटी | एचएमसीटी | -- |
| -- | वास्तुशास्त्र | -- |

(२ ) सदरहू योजनेचा लाभ घेण्यासाठी आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक आर्थिक उत्पन्न रु. १.०० लक्ष किंवा त्या रकमेच्या आत असणे आवश्यक राहील.

(३) आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना निर्धारीत शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतची प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यात येईल.

(४) सदरहू योजनेचा लाभ शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पूर्वी वा चालू शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांच्या पूर्ण कालावधीपर्यंत या आदेशातील अटी शर्तीनुसार लागू राहील.

(५) तंत्र शिक्षणाशी निगडीत पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतलेला आहे, असे विद्यार्थी या योजनेअंतर्गत लाभास पात्र असतील.

(६) सदरहू योजनेचा लाभ एआयईईई कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांनाही लागू राहील.

(७) सदर योजना ही खाजगी अभिमत विद्यापीठ अथवा खाजगी स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठातील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

(८) सदर योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ हा शासनाने निश्चित केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केवळ महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र असणा-या विदयार्थ्यांसाठीच मर्यादित राहील.

(९) शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ काणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल. म्हणजेच अन्य योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी कोणत्याही शिष्यवृत्ती / शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ घेत असल्यास तो विद्यार्थी या योजनेंतर्गत लाभ मिळण्यास पात्र असणार नाही.

(१०) लाभार्थी विद्यार्थ्याने नियमितपणे महाविद्यालय / तंत्रनिकेतनामध्ये शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे आवश्यक राहील व प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परीक्षा देणे आवश्यक राहील. केवळ विशिष्ट परिस्थितीत विशेषत: आजारपणाच्या कारणास्तव परीक्षा देणे शक्य झाले नसल्यास तसे संबंधित विदयार्थी व शैक्षणिक संस्थेने शिफारस केल्यानंतर संबंधीत उपसंचालक / सहसंचालक वा सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील.

(११) पात्र लाभार्थी विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतल्यानंतर एखादया सत्राची (सेमिस्टरची) परीक्षा दिली नसल्यास अथवा एखादया शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झाल्याने त्या वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास पुढील वर्षाकरिता सदर विद्यार्थी या योजनेचा लाभ मिळण्यास अपात्र राहील.

तथापि, तद्नंतर पुनश्चः त्या सत्र/वर्षात परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अथवा अंशत: पास (ATKT) झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाल्यास सदर योजनेच्या लाभासाठी पुन्हा पात्र ठरेल.

(१२) परंतु असे पात्र लाभार्थी विदयार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णत: अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसेल तर संबंधित विद्यार्थी प्रवेश

घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेंतर्गत लाभाकरिता कायमस्वरुपी अपात्र ठरेल.

(१३) लाभार्थी विदयार्थी व संबंधित शिक्षण संस्था यांनी सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जात चूकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर केल्यास त्यास उर्वरित अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी लाभ देण्यात येणार नाही. तसेच, त्या विदयार्थ्याला/संस्थेला त्यांनी सादर केलेल्या चूकीच्या माहितीच्या आधारे त्यापूर्वी मिळालेल्या लाभाच्या संपूर्ण रकमेची व्याजासह वसूली करण्यात येईल व कोणत्याही योजनेंतर्गत संबंधित विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती/शुल्क प्रतिपूर्ती मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल. या संदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही योजनेची अंमलबजावणी करणा-या सक्षम प्राधिकाऱ्याची असेल.

(१४) संबंधित विद्यार्थी स्वतःच्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करीत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमितपणे गैरहजर राहणे इत्यादी स्वरुपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्याची शुल्क प्रतिपूर्ती थांबविण्यात किंवा रद्द करण्यात येईल.

(१५) ज्या अभ्यासक्रमाकरिता पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास प्रतिपूर्ती प्रदान करण्यात आली आहे तो अभ्यासक्रम संबंधित विद्यार्थ्याने मध्येच सोडला तर अशा विद्यार्थ्यास प्रदान केलेल्या प्रतिपूर्तीची रक्कम राज्य शासनास योग्य वाटल्यास त्याच्या/तिच्याकडून वसुल केली जाईल.

(१६) सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या कोणत्याही पूर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व असे बदल केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याबाबतचा दावा कोणत्याही विद्यार्थ्यास किंवा शैक्षणिक संस्थेस अथवा विद्यार्थ्याच्या पालकांना शासनाच्या विरुध्द करता येणार नाही.

(१७) सदर योजनेच्या लाभाकरिता शासकीय अथवा शासन अनुदानित शैक्षणिक संस्था किंवा शासकीय विदयापीठ वगळून अन्य सर्व खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमधील पात्र विदयार्थ्यांचे प्रवेश व विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे असलेले शिक्षण शुल्क हे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक (प्रवेश व शिक्षण शुल्क यांचे विनियमन ) अधिनियम, २०१५ मधील तरतूदीनुसार शुल्क नियामक प्राधिकरणाकडून प्रत्येक वर्षी निश्चित करुन अंतिम करणे आवश्यक राहील.

(१८) सदर योजनेंतर्गत पात्र असणारे व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संबंधित शैक्षणिक संस्थांनी पुढील ३ वर्षाच्या आत म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर संस्थेकडून मूल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करणे (Assesment and Accreditation) आवश्यक राहील. तद्नंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधित शिखर संस्थांकडून मूल्यांकन व दर्जा निश्चिती करुन मूल्यांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांना मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त होईपर्यंत या योजनेतून वगळण्यात येईल व त्या वर्षापासून केवळ मानांकन प्राप्त करणाऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याकरिताच सदर योजना लागू राहील.

**शुल्क प्रतिपूर्तीच्या वितरणाची कार्यपद्धती:-**

(१९) सदर योजनेची अंमलबजावणी करणा-या प्रत्येक प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधिनस्त असलेल्या शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या पात्र लाभार्थींचे अर्ज स्विकारण्यासाठी संगणकीय ऑनलाईन प्रणाली निर्माण करावी. सदर प्रणाली निर्माण करुन आवश्यकतेनुरुप संबंधित विद्यापीठाशी जोडून त्याद्वारे संबंधित पात्र लाभार्थ्यांनी परीक्षा दिली आहे किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठीची सोय करण्यात यावी. याकरीता सर्व संबंधित विद्यापीठाकडून सक्षम प्राधिकाऱ्यांना त्यांच्या संगणक प्रणालीशी जोडण्यासाठी आवश्यक असलेले सर्व प्रकारचे सहकार्य करणे अनिवार्य असेल.

(२०) प्रत्येक प्रवर्गातील अर्जदार विद्यार्थ्याकरिता निश्चित केलेल्या त्याच्या कुटुंबाची (दोन्ही पालकांची एकत्र) उत्पन्न मर्यादा ही सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केल्याची खातरजमा करणे आवश्यक असून आर्थिक मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र हे किमान संबंधित तहसिलदार यांचे असावे.

(२१) प्रत्येक लाभार्थी विदयार्थ्याचा आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांक नमूद करुन संबंधित विद्यार्थी प्रत्येक वर्षाच्या प्रथम सत्राच्या / वर्षाच्या परीक्षेस बसला असल्याबाबत संगणकीय प्रणालीव्दारे खातरजमा करुन त्या विदयार्थ्याची सर्व माहिती शैक्षणिक संस्थेने ऑनलाईन स्वरुपात प्रमाणित करुन ऑनलाईन अर्ज सक्षम अधिका-याकडे सादर करणे आवश्यक राहिल.

(२२) प्रत्येक लाभार्थी विद्यार्थी हा संबंधित शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतल्याची अथवा शिक्षण घेत असल्याची व शैक्षणिक संस्थेत बनावट विद्यार्थ्याची नोंद नसल्याची संगणकीय प्रणालीद्वारे पडताळणी करणे आवश्यक असेल.

(२३) सक्षम प्राधिका-यास ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यामधील विदयार्थ्याची सर्व माहिती व त्यास दिलेला प्रवेश हा प्रवेश नियमन प्राधिकरणाद्वारे वैध ठरविण्यात आल्याची पडताळणी करावी.

(२४) पात्र विद्यार्थ्यांची माहिती आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांकाशी संबंधित संचालनालय/ शैक्षणिक संस्था/विद्यापीठ यांचेकडील अथवा अन्य उपलब्ध व्यक्तिगत माहितीशी संलग्नीत झाल्यानंतर संबंधित विद्यार्थी प्रत्यक्षात शैक्षणिक संस्थेत शिकत असल्याची आणि शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्राच्या परीक्षेस बसला असेल अशा व केवळ उपरोक्त नमूद सर्व अटी/शर्तींची पूर्तता करत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांनाच सदर योजनेतील लाभासाठी पात्र समजण्यात येईल.

(२५) ज्या अभ्यासक्रमांना सत्र परीक्षा पध्दती लागू नाही, अशा अभ्यासक्रमाकरीता संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश हा प्रवेश नियमन प्राधिकरण व संबंधित विद्यापीठाने निश्चित केल्यानंतर विद्यापीठाच्या पटावर नोंदविण्यात आलेला नोंदणी क्रमांक तपासून संबंधित अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या पात्र विदयार्थ्याला व सहा महिन्याचे पट पडताळून त्याला प्रमाणपत्र दिल्यावर लाभासाठी निश्चित करण्यात येईल. संस्थेने खोटे प्रमाणपत्र दिल्यास संस्थेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(२६) पात्र विदयार्थ्यांची विहित मर्यादेतील प्रतिपूर्ती सक्षम प्राधिकाऱ्याकडून ही थेट स्वरुपात संबंधित शिक्षण संस्थेला त्यांच्या बँक खात्यात ECS द्वारे प्रतिपूर्ती करणे आवश्यक असेल.

(२७) वरीलप्रमाणे पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती केल्यानंतर दरवर्षी अशा लाभार्थी विद्यार्थ्यांची अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्थानिहाय सविस्तर यादी ही अंमलबजावणी करणा-या विभागाच्या अखत्यारितील संचालनालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या संकेतस्थळावर न चुकता प्रसिध्द करणे बंधनकारक असेल.

(२८) तसेच सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांपोटी शासनाकडून संबंधित शैक्षणिक संस्थांना अदा करण्यात येणाऱ्या शुल्क प्रतिपूर्तीबाबत विविध विभागांच्या अखत्यारीतील सर्व सक्षम प्राधिकारी किंवा नेमून दिलेल्या त्यांच्या प्रतिनिधीद्वारे वेळोवेळी दरवर्षी लाभार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व उपस्थिती बाबत खात्री करावी. त्यासाठी आवश्यक त्या सूचना वेळापत्रकासह सक्षम प्राधिकारी व संनियंत्रण अधिकाऱ्यांनी निर्गमित कराव्यात. तसेच या योजनेतील त्रुटी संदर्भातील निरीक्षण व फलनिष्पत्तीचा अहवाल सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत शासनास न चुकता वेळोवेळी सादर करणे अनिवार्य असेल.

(२९) सदर योजनेंतर्गत या विभागाच्या अखत्यारितील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतीपूर्तीची अंमलबजावणी करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण, यांना व संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, यांना सनियंत्रण व समन्वयक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(३०) सदर योजनेच्या वर नमूद सुधारीत अंमलबजावणीच्या पध्दतीबाबत व योजनेच्या फलनिष्पत्तीसंदर्भात शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी न चुकता अंमलबजावणी करणाऱ्या संबंधित विभागांनी सविस्तर आढावा घ्यावा. तसेच आढाव्याअंती आवश्यकतेनुरुप योजनेच्या अंमलबजावणीत वित्त विभागाच्या सल्लयाने संबंधित प्रशासकीय विभागांनी सुधारणा करावी.

(३१) सदर शासन निर्णयानुसार अन्य सर्व संबंधित प्रशासकिय विभाग देखील त्यांच्या विभागांतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांसाठी त्यांचे स्वतंत्र शासन आदेश निर्गमित करतील व त्यामध्ये त्या-त्या सामाजिक मागास प्रवर्गाकरिता लागू असलेले आर्थिक निकष नमूद करुन अन्य सर्व अटी /शर्ती या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे त्यांचा अंतर्भाव करणे आवश्यक राहील. ज्या प्रशासकीय विभागाकडून या योजनांतर्गत त्यांच्या आखत्यारीतील विद्यार्थ्यांना थेट स्वरुपात डीबीटी द्वारे शिष्यवृत्ती /प्रतिपूर्ती करण्यात येत असल्यास ती कार्यपध्दती सुरु ठेवावी, परंतु वर नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थी संबंधित महाविद्यालयात प्रत्यक्षात शिकत असल्याची व वेळोवेळी परीक्षा देउन उत्तीर्ण होत असल्याची खातरजमा करण्यासाठी वर नमूद अटी, शर्ती व विहित पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक असेल.

(३२) तंत्र शिक्षणाशी निगडीत वरील मुद्दा क्र. १ येथील आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीचा खर्च, मुख्य लेखाशिर्ष " २२०३-तंत्र शिक्षण, १०७ शिष्यवृत्त्या, (००)(०६) ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे उत्पन्न रुपये १.०० लाखापेक्षा अधिक नाही, अशा व्यावसायिक

अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना ५० टक्के फी माफी (२२०३०७४८), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. २०२/व्यय-५, दिनांक २९.०३.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३३११०५६४४७७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dr. Kiran N Patil

Digitally signed by Dr. Kiran N Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dr. Kiran N Patil
Date: 2016.03.31 11:15:38 +05'30'

(डॉ. किरण पाटील)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव, (कृषि) कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव (पदुम), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) आयुक्त, सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, बांद्रा (पूर्व), मुंबई.
११) सचिव, प्रवेश व शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, बांद्रा (पूर्व), मुंबई.
१२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४) आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१६) आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८) आयुक्त, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
१९) संचालक, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०) कुलगुरु, सर्व विद्यापीठे.

२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी)
२२) अप्पर आयुक्त, आदिवासी विकास (सर्व).
२३) सर्व जिल्हाधिकारी
२४) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२६) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२८) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३०) सर्व संबंधित मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक.
३१) अवर सचिव, (तांशि-३/तांशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३२) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
३३) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक.
३४) निवड नस्ती ( कार्यासन - तांशि-४).

मान्यता प्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणाऱ्या आर्थिकदृष्टयादुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क योजनेंतर्गत लाभ देण्याकरिता पात्रतेसाठी कुटुंबांची वार्षिक आर्थिक मर्यादा रु. ६ लाख करणे व प्रचलित योजनेची व्याप्ती वाढविणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: १३ ऑक्टोबर, २०१६

**संदर्भ :** १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टिईएम-२००६/(३५३/०६)/तांशि-१, दिनांक २१/०३/२००७
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक ईबीसी-२००८/(२३६/०८)/तांशि-४, दिनांक २६/०२/२०१०
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक ईबीसी-२०११/प्र.क्र.७४/मशि-२, दिनांक २५/०५/२०१२
४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दिनांक ३१/०३/२०१६
५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.३२५/तांशि-४, दिनांक २०/०७/२०१६

प्रस्तावना:

सध्या राज्यात ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. १ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिकदृष्टया दूर्बल घटकातील विदयार्थ्यांसाठी शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यापैकी "राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना" अंतर्गत खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने मध्ये खालील निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणा-या सदरच्या दूर्बल घटकातील विदयार्थ्यांकडून आकारण्यात येणा-या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यन्तच्या शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येते. सदर योजनेंतर्गत ज्या विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांना संबंधित प्रशासकीय विभागाकडून आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रतिपूर्ती करण्यात येते ते अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | विभागाचे नांव | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | पदविका: अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी<br>पदवी: अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, वास्तुशास्त्र.<br>पदव्युत्तर पदवी: मास्टर ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट / मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मास्टर ऑफ कंम्प्युटर अप्लिकेशन |
| २ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | पदवी:एम.बी.बी.एस., बी.डी.एस., बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस., बी.यु.एम.एस., बी.पी.टी.एच., बी.ओ.टी.एच. व नर्सिंग |
| ३ | कृषि विभाग | पदविका :कृषि<br>पदवी : फलोत्पादन, जैव तंत्रज्ञान, अन्न तंत्रज्ञान, शेती व्यवस्थापन |
| ४ | पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग | पदविका : दुग्धव्यवसाय व्यवस्थापन, पशुसंवर्धन व्यवस्थापन.<br>पदवी: प्राणिशास्त्र व पशुसंवर्धन, दुग्धतंत्रज्ञान, मत्स्यविज्ञान<br>पदव्युत्तर पदवी: प्राणिशास्त्र |

२. तसेच शासकीय व अनुदानित महाविदयालयांमध्ये शैक्षणिक अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेणा-या ज्या विदयार्थ्यांच्या कुटुंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. १ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिकदृष्टया दूर्बल घटकातील विदयार्थ्यांसाठी देखिल स्वतंत्रपणे शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे.

३. आर्थिकदृष्टया दूर्बल घटकातील विदयार्थ्याकरिता वरील नमूद आर्थिक निकष विचारात घेऊन सदयःस्थितीत या घटकातील विशेषत: गुणवंत विदयार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी विशेष उपाय योजना करणे शासनाच्या विचाराधिन होते.

४. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन राज्यातील सर्व खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये / तंत्रनिकेतने (खाजगी अभिमत/स्वयं अर्थ सहाय्य विदयापिठे वगळुन) आणि शासकीय, शासन अनुदानित व शासकीय विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतनांमधील (शासकीय अभिमत विदयापिठांसह) शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिका-यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेणारे ईबीसी धारक विद्यार्थ्यांकरीता (व्यवस्थापन कोटयातील/संस्थास्तरावरील प्रवेश वगळुन) त्यांच्या कुटूंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ही रुपये १.०० लाख वरुन ६.०० लाखपर्यन्त वाढविण्याची व प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेची व्याप्ती विस्तारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

५. तसेच सध्या तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेताना विद्यार्थी शासकीय व अनुदानित महाविद्यालय/तंत्रनिकेतने/शासकीय अभिमत विद्यापीठ यांना प्राथम्य/पसंती देऊन प्रवेशासाठी उत्सुक असतात. त्यानंतर सदरहू विद्यार्थ्यांचा खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेण्याकडे कल असल्याचे दिसते. म्हणजेच जास्तीत जास्त

गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी हे शासकीय/अनुदानित महाविद्यालय/तंत्रनिकेतनात प्रवेश घेऊनही विशेषत: आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता प्रचलित निकषानुसार अभियांत्रिकी महाविद्यालये/तंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांना अनुक्रमे रुपये ३६०/-, रुपये ५००/- व रुपये ४००/- इतक्या मर्यादेपर्यंत शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्यातयेते. परंतु प्रचलीत राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणा-या आर्थिक मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी संबंधित महाविद्यालय/तंत्रनिकेतने यांना त्यांच्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंत प्रतिपूर्ती करण्यात येते.

यामुळे विविध विभागांच्या अखत्यारितील शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये (शासकीय अभिमत विद्यापीठ यांचेसह) शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न हे रुपये २.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षणशुल्काच्या ५० टक्के पर्यंतची प्रतिपूर्ती शासनाकडून संबंधित महाविद्यालये/तंत्रनिकेतने यांना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

६. तसेच प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून शासकीय, शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठांसह), विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) महाविद्यालये/तंत्रनिकेतनांमध्ये सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे (व्यवस्थापन कोटयातील/संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २.५० लाख ते रुपये ६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांपैकी जे विदयार्थी पदवी/पदव्युत्तर पदवी/इयत्ता १२ वी नंतरच्या पदविका या व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेऊ इच्छिणा-यांसाठी इयत्ता १२वी च्या परीक्षेमध्ये व इयत्ता १० नंतरच्या पदविका अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेऊ इच्छिणा-यांसाठी इयत्ता १० वी च्या परिक्षेमध्ये एकत्रित किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत अशा गुणवंत विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी प्रतिपूर्ती करण्याचा प्रस्ताव विचाराधिन होता.

७. याशिवाय वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील एम.बी.बी.एस.(बॅचलर ऑफ मेडिसिन ॲण्ड बॅचलर ऑफ सर्जरी) व बी.डी.एस.(बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी) या पदवी अभ्यासक्रमांसाठीचे शिक्षण हे आर्थिकदृष्टया विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेरील असल्यामुळे गुणवान विद्यार्थी यापासून वंचित राहू नयेत म्हणून केवळ या अभ्यासक्रमांसाठी खाजगी विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) महाविद्यालयांमध्ये शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे प्रवेश घेणाऱ्या (व्यवस्थापन कोटयातील/संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये २.५० लाख पेक्षा जास्त व रुपये ६ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता १२वी च्या परीक्षेमध्ये एकत्रित

किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत अशा गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रवेशित अभ्यासक्रमांसाठी शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरणाव्दारे निश्चित केलेले शैक्षणिक शुल्क महाविद्यालयास देण्यासाठी राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित बँकेकडून शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास त्या कर्जावरील व्याजाची रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेकडून देण्यात येणा-या शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या मर्यादेपर्यन्तची रक्कम ही अनुदान स्वरुपात शासनाकडून संबंधीत बँकेस अदा करण्याबाबतचा निर्णय शासनाच्या विचाराधिन होता.

८. तसेच सध्या शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या "राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना" या ऐवजी " राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना" या नावाने संबोधण्याचे प्रस्तावित होते.

९. याशिवाय शासनाने निर्धारीत केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना शासकीय, शासन अनुदानीत व विनाअनुदानीत अभियांत्रिकी महाविद्यालये/तंत्रनिकेतन मध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी आहेत किंवा ज्यांचे पालक नोंदणीकृत मजूर आहेत अशा विदयार्थ्यांकरिता "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना " सुरु करण्याचे प्रस्तावित होते. सदर योजनेंतर्गत वरील प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्यांचा वस्तीगृहातील खर्च भागविण्यास सहाय्य व्हावे याकरिता या प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी राज्यातील महानगरातील (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर, इत्यादी) वस्तीगृहांमध्ये प्रवेशित आहेत त्या विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी प्रतिमहा रुपये ३०००/- व अन्य ठिकाणी असलेल्या वस्तीगृहांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी प्रतिमहा रुपये २०००/- इतका निर्वाह भत्ता (Hostel Maintenance Allowance) देण्याचे प्रस्तावित होते.

१०. उपरोक्त बाबी विचारात घेऊन विभागाने मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मंत्रिमंडळाने दिनांक १३/१०/२०१६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने सदरचा शासन निर्णय पुढीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय:

(१) प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांपैकी एम.बी.बी.एस. व बी.डी.एस. या अभ्यासक्रमांसाठी खालील अनुक्रमांक "(२)" येथे प्रस्तावित केल्याप्रमाणे व उर्वरीत व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासकीय व शासन अनुदानित (शासकीय अभिमत विदयापिठांसह) व खाजगी विनाअनुदानित (खाजगी अभिमत/स्वयं अर्थ सहाय्य विदयापिठे वगळुन ) व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये/तंत्रनिकेतनामध्ये शासनाच्या सक्षम प्राधिका-यामार्फत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणा-या व चालू

शैक्षणिक वर्षामध्ये विविध शैक्षणिक वर्षात शिकत असलेल्या आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील ज्या विदयार्थ्यांच्या कुटुंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाख ते रु. ६ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विदयार्थ्यांपैकी जे विदयार्थी पदवी/पदव्युत्तर पदवी/इयत्ता १२ वी नंतरच्या पदविका या व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेऊ इच्छिणा-यांसाठी इयत्ता १२वी च्या परीक्षेमध्ये व इयत्ता १० नंतरच्या पदविका अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेऊ इच्छिणा-यांसाठी इयत्ता १० वी च्या परिक्षेमध्ये एकत्रितपणे किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत अशा गुणवंत विदयार्थ्यांना (व्यवस्थापन कोट्यातील /संस्था स्तरावरील प्रवेशित विदयार्थी वगळुन ) त्यांच्या प्रवेशित अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क नियमन प्राधिकरणाद्वारे निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी प्रतिपूर्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(२) वैदयकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील एम.बी.बी.एस. (बॅचलर ऑफ मेडिसिन अँड बॅचलर ऑफ सर्जरी) व बी.डी.एस. (बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी ) या अभ्यासक्रमांसाठी शासकीय, अनुदानित आणि खाजगी विनाअनुदानित (खाजगी अभिमत विदयापीठे व स्वयंअर्थ सहाय्य विदयापीठे वगळुन ) महाविदयालयांमध्ये शासनाच्या सक्षम प्राधिका-यामार्फत केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणा-या व चालू शैक्षणिक वर्षामध्ये विविध शैक्षणिक वर्षात शिकत असलेल्या विदयार्थ्यांपैकी ज्या विदयार्थ्यांच्या कुटुंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखपेक्षा जास्त व रु. ६ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विदयार्थ्यांपैकी ज्या विदयार्थ्यांना इयत्ता १२ वी च्या परीक्षेमध्ये एकत्रितपणे किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत अशा गुणवंत विदयार्थ्यांना (व्यवस्थापन कोटयातील/संस्था स्तरावरील प्रवेशित विदयार्थी वगळुन) त्यांच्या प्रवेशित अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क नियमन प्राधिकरणाद्वारे निश्चित केलेले शैक्षणिक शुल्क महाविदयालयास देण्यासाठी राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित बँकेकडून शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास त्या कर्जावरील व्याजाची रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेकडून देण्यात येणा-या शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या मर्यादेपर्यन्तची रक्कम ही अनुदान स्वरुपात शासनाकडून संबंधित बँकेस अदा करण्यास ही शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

(३) प्रचलित राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत राज्यातील सर्व खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये / तंत्रनिकेतने (खाजगी अभिमत / स्वयं अर्थ सहाय्य विदयापिठे वगळुन) आणि शासकीय, शासन अनुदानित व शासकीय विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतनांमध्ये (शासकीय अभिमत विदयापिठांसह) शासनाने निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिका-यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेणारे ईबीसी धारक विद्यार्थ्यांकरीता (व्यवस्थापन कोटयातील /संस्था स्तरावरील प्रवेश वगळुन) त्यांच्या कुटूंबाची (दोन्ही

पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न मर्यादा ही रुपये १.०० लाख वरुन २.५० लाख करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

(४) तसेच प्रचलित राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत शासकीय व शासन अनुदानित संस्थांमध्ये (शासकीय अभिमत विदयापिठांसह) शासनाने निर्धारित्त केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेणाऱ्या ईबीसी धारक विद्यार्थ्यांना देखील, सध्या अल्पदराने देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती ऐवजी शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत खाजगी कायम विनाअनुदानीत शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी प्रतिपूर्ती करण्यात येईल. या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सदर योजनेची अंमलबजावणी ही तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत करण्यात येईल.

(५) उच्च शिक्षण उपविभागांतर्गत व उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित (टप्पा अनुदानावरील) महाविद्यालयांमधील ईबीसी धारक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्तीच्या प्रचलित योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी विदयार्थ्यांच्या कुटूंबाची (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न मर्यादा ही रुपये १ लाख वरुन रुपये २.५० लाख इतकी करण्यात येत आहे.

(६) सध्या शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या "राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना" या ऐवजी " राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना" या नावाने संबोधण्यात येईल.

(७) शासनाने निर्धारीत केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना शासकीय, शासन अनुदानीत व विनाअनुदानीत अभियांत्रिकी महाविद्यालये/तंत्रनिकेतन मध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांचे पालक सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केल्याप्रमाणे अल्पभूधारक शेतकरी आहेत किंवा ज्यांचे पालक नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांकरिता "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना " या नावाने योजना सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. वरील निकषांची पूर्तता करणा-या विदयार्थ्यांपैकी जे विद्यार्थी राज्यातील महानगरांतील (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) प्रवेशित आहेत, त्या विद्यार्थ्यासाठी प्रति विद्यार्थी प्रतिमहा रुपये ३०००/- व राज्यातील अन्य ठिकाणी असलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी प्रतिमहा रुपये २०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता (Hostel Maintenance Allowance) देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निर्वाहभत्ता हा शैक्षणिक वर्षातील सुट्टीचा कालावधी वगळून उर्वरित १० महिन्यांच्या कालावधीकरिता अनुज्ञेय असेल.

(८) वरील नमूद राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ हा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ व त्यापूर्वी ज्या विदयार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे व चालू शैक्षणिक वर्षामध्ये विविध शैक्षणिक सत्रात शिकत आहेत अशा महाराष्ट्रातील अधिवासधारक व वादग्रस्त महाराष्ट्र-कर्नाटक सीमा क्षेत्रातील विदयार्थ्यांसह जे विदयार्थी वरील अटींची पूर्तता करतील अशा सर्व विदयार्थांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून पुढे लाभ अनुज्ञेय असेल.

(९) या योजनेंतर्गत पात्र असणा-या लाभार्थी विदयार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी महाविदयालयाच्या संबंधित अभ्यासक्रमाकरिता शिक्षण शुल्क नियमन प्राधिकरणाने (शासकीय संस्थांकरीता शासनाने) निर्धारित केलेले शिक्षण शुल्काच्या केवळ ५० टक्केच्या मर्यादेपर्यन्तचे शुल्क आकारण्यात यावे व उर्वरित ५० टक्के शुल्काची शासनाकडून या योजनेंतर्गत प्रतिपूर्ती संबंधित शैक्षणिक संस्थेस करण्यात येईल.

(१०) वरील सुधारीत शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत लाभ घेणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांपैकी किमान ५० टक्के इतक्या प्रवेशित लाभार्थी विद्यार्थ्यांना नोकरीची संधी (Placements) मिळवून देण्यास संबंधित महाविद्यालय/तंत्रनिकेतने प्रयत्नशील राहतील व या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती दरवर्षी एकत्रितपणे योजनेची अंमलबजावणी करणा-या सक्षम प्राधिका-यास सादर करतील.

(११) तसेच शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत मंत्रीमंडळाने या पूर्वी दिलेल्या मान्यतेनुसार विभागाने दिनांक ३१.३.२०१६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार संबंधित सर्व शैक्षणिक संस्थांनी त्यांचे विहीत मूल्यांकन/दर्जा निश्चितीकरण संस्थांमार्फत (NAAC, NBA, इ.सारख्या) मूल्यांकन करून घेणे आवश्यक असेल. तसेच वरील शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अन्य अटी व शर्ती पात्र लाभार्थी, शैक्षणिक संस्था आणि योजनेची अंमलबजावणी करणा-या सक्षम संनियंत्रण अधिकारी/यंत्रणा करिता लागू असतील.

(१२) या योजनांची तात्काळ अंमलबजावणी करण्यासाठी चालू वित्तीय वर्षाकरिता येणारा अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागांना आकस्मिक निधीतून संबंधित विभागांच्या आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून देण्यात येईल. यानुसार सदर प्रयोजनार्थ येणारा अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागांनी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी उचित कार्यवाही करावी .

(१३) शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्ती / प्रतिपूर्ती योजनांची प्रभाविपणे व पारदर्शक पध्दतीने अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागांनी ऑनलाईन संगणकीय प्रणाली विकसित करावी. तसेच या अनुषंगाने यापूर्वी विभागाने संदर्भ क्र.५ अन्वये दिनांक २०/७/२०१६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील सूचनेनुसार योजनेच्या संबंधित संनियंत्रण अधिका-यानी तात्काळ कार्यवाही करावी.

(१४) सदरच्या शासन निर्णयास अनुसरुन सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्या विभागांतर्गत आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विदयार्थ्यांकरीता राबविल्या जाणाऱ्या योजनांच्या संदर्भात आवश्यक ते पूरक आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

(१५) या शासन निर्णयातील नमूद योजनांकरिताचे निकष, अटी व शर्ती हे केवळ वरील नविन राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरिता लागू राहतील.

<u>शुल्क प्रतिपूर्तीच्या वितरणाची कार्यपद्धती:-</u>

(१६) सदर योजनेची अंमलबजावणी करणा-या प्रत्येक प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधिनस्त असलेल्या शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या पात्र लाभार्थींचे अर्ज स्विकारण्यासाठी संगणकीय ऑनलाईन प्रणाली निर्माण करुन आवश्यकतेनुरुप संबंधित विद्यापीठाशी जोडून त्याद्वारे विदयार्थी व संस्थेशी संबंधित सर्व बाबींची वरील संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे पडताळणी करण्यासाठीची सोय करण्यात यावी. याकरीता सर्व संबंधित विद्यापीठाकडून सक्षम प्राधिकाऱ्यांना त्यांच्या संगणक प्रणालीशी जोडण्यासाठी आवश्यक असलेले सर्व प्रकारचे सहकार्य करणे अनिवार्य असेल.

(१७) प्रत्येक प्रवर्गातील अर्जदार विद्यार्थ्यांकरिता निश्चित केलेल्या त्याच्या कुटुंबाची (दोन्ही पालकांची एकत्र) उत्पन्न मर्यादा ही सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केल्याची खातरजमा करणे आवश्यक असून आर्थिक मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र हे किमान संबंधित तहसिलदार यांचे असावे.

(१८) तसेच सक्षम प्राधिकरणांनी दिलेले अधिवास प्रमाणपत्र प्रत्येक इच्छुक लाभार्थ्याने सादर करणे आवश्यक राहिल.

(१९) प्रत्येक लाभार्थी विदयार्थ्याचा आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांक नमूद करुन संबंधित विद्यार्थी प्रत्येक वर्षाच्या प्रथम सत्राच्या / वर्षाच्या परीक्षेस बसला असल्याबाबत संगणकीय प्रणालीव्दारे खातरजमा करुन त्या विदयार्थ्याची सर्व माहिती शैक्षणिक संस्थेने ऑनलाईन स्वरुपात प्रमाणित करुन ऑनलाईन अर्ज सक्षम अधिका-याकडे सादर करणे आवश्यक राहिल.

(२०) प्रत्येक लाभार्थी विद्यार्थी हा संबंधित शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतल्याची अथवा शिक्षण घेत असल्याची व शैक्षणिक संस्थेत बनावट विद्यार्थ्यांची नोंद नसल्याची संगणकीय प्रणालीद्वारे पडताळणी करणे आवश्यक असेल.

(२१) सक्षम प्राधिका-यास ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यामधील विदयार्थ्याची सर्व माहिती व त्यास दिलेला प्रवेश हा प्रवेश नियमन प्राधिकरणाद्वारे वैध ठरविण्यात आल्याची पडताळणी करावी.

(२२) पात्र विद्यार्थ्यांची माहिती आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांकाशी संबंधित संचालनालय/ शैक्षणिक संस्था/विद्यापीठ यांचेकडील अथवा अन्य उपलब्ध व्यक्तिगत माहितीशी संलग्नीत झाल्यानंतर संबंधित विद्यार्थी प्रत्यक्षात शैक्षणिक संस्थेत शिकत असल्याची आणि शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्राच्या परीक्षेस बसला असेल अशा व केवळ उपरोक्त नमूद सर्व अटी/शर्तीची पूर्तता करत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांनाच सदर योजनेतील लाभासाठी पात्र समजण्यात येईल.

(२३) ज्या अभ्यासक्रमांना सत्र परीक्षा पध्दती लागू नाही, अशा अभ्यासक्रमाकरीता संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश हा प्रवेश नियमन प्राधिकरण व संबंधित विद्यापीठाने निश्चित केल्यानंतर विद्यापीठाच्या पटावर नोंदविण्यात आलेला नोंदणी क्रमांक तपासून संबंधित अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या पात्र विदयार्थ्याला व पट पडताळून त्याला प्रमाणपत्र दिल्यावर लाभासाठी निश्चित करण्यात येईल. संस्थेने खोटे प्रमाणपत्र दिल्यास संस्थेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(२४) अशा पात्र विदयार्थ्यांची विहित मर्यादेतील प्रतिपूर्ती सक्षम प्राधिकाऱ्याकडून ही थेट स्वरुपात संबंधित शिक्षण संस्थेला त्यांच्या बँक खात्यात ECS द्वारे प्रतिपूर्ती करणे आवश्यक असेल.

(२५) वरीलप्रमाणे पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती केल्यानंतर दरवर्षी अशा लाभार्थी विद्यार्थ्यांची अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्थानिहाय सविस्तर यादी ही अंमलबजावणी करणा-या विभागाच्या अखत्यारितील संचालनालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या संकेतस्थळावर न चुकता प्रसिध्द करणे बंधनकारक असेल.

(२६) तसेच सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांपोटी शासनाकडून संबंधित शैक्षणिक संस्थांना अदा करण्यात येणाऱ्या शुल्क प्रतिपूर्तीबाबत विविध विभागांच्या अखत्यारीतील सर्व सक्षम प्राधिकारी किंवा नेमून दिलेल्या त्यांच्या प्रतिनिधीद्वारे वेळोवेळी दरवर्षी लाभार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व उपस्थिती बाबत खात्री करावी. त्यासाठी आवश्यक त्या सूचना वेळापत्रकासह सक्षम प्राधिकारी व संनियंत्रण अधिकाऱ्यांनी निर्गमित करावीत. तसेच या योजनेतील त्रुटी संदर्भातील निरीक्षण व फलनिष्पत्तीचा अहवाल सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत शासनास न चुकता वेळोवेळी सादर करणे अनिवार्य असेल.

(२७) सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक, ४८७/२०१६/व्यय-५, दिनांक १७-०९-२०१६ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

(२८) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धकरुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१६१०१३१६०१५८८४०८ असा आहे. सदरचे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Dr. Kiran N Patil

Digitally signed by Dr. Kiran N Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dr. Kiran N Patil
Date: 2016.10.14 17:23:59 +05'30'

(डॉ. किरण पाटील)
उपसचिव, महाराष्ट्रशासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (प.दु.म.), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, सामाजिक न्याय व विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
११. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे,
१२. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक
१३. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१४. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१५. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१६. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे

२०. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. २१ आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
२४. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
२५. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,
२६. खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२७. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२८. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३०. (प्रसिध्दीसाठी)
३१. सर्व जिल्हाधिकारी
३२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३३. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३७. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
३८. उप सचिव (मशि/विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३९. अवर सचिव (तांशि-३/तांशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४०. कक्ष अधिकारी (मशि-२/मशि-४), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४१. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
४२. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
४३. निवडनस्ती/तांशि-४

राजर्षी छत्रपती शाहू महाराज राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट रक्कम जमा करणेबाबत...

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: १५ एप्रिल, २०१७

<u>संदर्भ</u> : १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दिनांक ३१/०३/२०१६
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.३२५/तांशि-४, दिनांक २०/०७/२०१६
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १३/१०/२०१६
४) महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थ सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम,२०१६
५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन अधिसूचना क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १३/०४/२०१७

<u>प्रस्तावना :</u>

सध्या राज्यात " राजर्षी छत्रपती शाहू महाराज राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना" अंतर्गत वरील संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये शासकीय, शासन अनुदानित व खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने मध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत खालील निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विदयार्थ्यांकडून आकारण्यात येणा-या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यन्तच्या शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती विविध अटी / शर्तींच्या अधीन राहून शासनाकडून करण्यात येते.

| अ.क्र. | विभागाचे नांव | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | **पदविका:** अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी<br>**पदवी:** अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, वास्तुशास्त्र. |

| | | |
|---|---|---|
| | | **पदव्युत्तर पदवी:** मास्टर ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट / मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मास्टर ऑफ कंम्प्युटर अप्लिकेशन |
| २ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | पदवी:एम.बी.बी.एस.,बी.डी.एस.,बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस.,बी.यु.एम.एस.,बी.पी.टी.एच., बी.ओ.टी.एच. व नर्सिंग |
| ३ | कृषी विभाग | पदविका :कृषी<br>पदवी : फलोत्पादन, जैव तंत्रज्ञान, अन्न तंत्रज्ञान, शेती व्यवस्थापन |
| ४ | पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग | **पदविका:** दुग्धव्यवसाय व्यवस्थापन, पशुसंवर्धन व्यवस्थापन.<br>**पदवी:** प्राणिशास्त्र व पशुसंवर्धन, दुग्धतंत्रज्ञान, मत्स्यविज्ञान<br>**पदव्युत्तर पदवी:** प्राणिशास्त्र |

२. तसेच वरील संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये शासनाने निर्धारीत केलेल्या उपरोक्त निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांना शासकीय, शासन अनुदानीत व विनाअनुदानीत अभियांत्रिकी महाविद्यालये/तंत्रनिकेतन मध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी आहेत किंवा ज्यांचे पालक नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांकरिता "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना " कार्यान्वित केली आहे.

३. सध्या महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थ सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम,२०१६ अंतर्गत संदर्भ क्रमांक ५ येथील अधिसूचनेतील तरतूदीनुसार शासनाकडून देण्यात येणारे कोणतेही अर्थसहाय्य, वित्तीय लाभ व सेवाच्या प्रयोजनार्थ संबंधित लाभार्थ्यांचे अधिप्रमाणन करुन किंवा पुरावा म्हणून आधार क्रमांक प्राप्त करुन त्या आधारे लाभार्थ्यांस वित्तिय लाभाची रक्कम थेट शिष्यवृत्ती स्वरुपात त्यांच्या आधारसंलग्नीत बँक खात्यात जमा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

४. तरी वरील योजनेंतर्गत पात्र लाभार्थी विदयार्थ्यांना देण्यात येणारी लाभाची रक्कम ही थेट लाभार्थ्यास त्यांच्या आधारसंलग्नीत बँक खात्यात शासनाकडून जमा करण्यासाठी पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

## शासन निर्णय:

वरील संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये प्रचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत विविध प्रशासकीय विभागाच्या अखत्यारितील निवडक अभ्यासक्रमांना शासकीय, शासन अनुदानित व खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयात (खाजगी अभिमत विद्यापीठे व खाजगी स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या माध्यमातून प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येतो. या योजनेंतर्गत या प्रवर्गातील विदयार्थ्यांना त्यांच्या प्रवेशित महाविद्यालय / तंत्रनिकेतनांकरिता शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरणाने / शासनाने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतचे शुल्क हे सध्या संबंधित शैक्षणिक संस्थेस शासनाकडून प्रतिपूर्ती करण्यात येते. आता शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून वरीलप्रमाणे करण्यात येणारी

शैक्षणिक शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती ही संदर्भ क्र.५ येथील महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम,२०१६ मधील तरतूदी व संदर्भ क्रमांक ४ येथील अधिसूचना विचारात घेऊन संबंधित महाविद्यालय / तंत्रनिकेतने यांना करण्याऐवजी पात्र लाभार्थ्यास शिष्यवृत्ती स्वरुपात थेट त्यांच्या आधारसंलग्नीत बँक खात्यात जमा करण्यात यावी. सबब प्रचलित " **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना**" या योजनेस " **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना**" असे संबोधण्यात येईल.

२. याचप्रमाणे वरील संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये शासनाने अल्पभूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर यांच्या पाल्यांकरिता कार्यान्वित केलेल्या "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना " अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणारी लाभाची रक्कम ही थेट स्वरुपात लाभार्थ्याच्या आधारसंलग्नीत बँक खात्यात संबंधित प्रशासकीय विभागाकडून जमा करण्यात यावी.

३. वरील दोन्ही योजनांसदर्भात संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अन्य सर्व अटी, शर्ती व निकष हे दोन्ही योजनांकरीता कायम राहतील. तसेच शासकीय, शासन अनुदानित आणि विनाअनुदानित महाविदयालये / तंत्रनिकेतनांना सदर योजनेंतर्गत समाविष्ट होण्यासाठी संस्थेतील प्रवेशित सर्व विदयार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती पारदर्शीपणे नोंदविणे आवश्यक असेल. याकरिता महाविदयालये/तंत्रनिकेतनांच्या परिसरात संबंधित शैक्षणिक संस्थांना आधार संलग्नीत बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणाली स्थापीत करणे बंधनकारक असेल. उपरोक्त योजनांतर्गत लाभ घेण्यासाठी संबंधित शैक्षणिक वर्षात इच्छुक अर्जदार विद्यार्थ्यांची प्रवेशित अभ्यासक्रमासाठी किमान ५० टक्के उपस्थिती आवश्यक असुन सदरची उपस्थिती ही आधारसंलग्नीत बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीवर विद्यार्थ्यांनी नोंदविणे आवश्यक असेल. तथापि, संबंधित विदयापिठ/महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्या प्रचलित नियमानुसार त्यांनी परिक्षांसारख्या अन्य विविध प्रयोजनार्थ विहित केलेल्या उपस्थितीच्या प्रमाणाची स्वतंत्रपणे सर्व संबंधित विदयार्थ्यांना पूर्तता करणे आवश्यक असेल.

४. या प्रयोजनार्थ सर्व संबंधित महाविद्यालये / तंत्रनिकेतने यांनी पुढील ६ महिन्यापर्यतच्या कालावधीत म्हणजेच ऑक्टोबर,२०१७ पर्यंत स्वखर्चाने आधारसंलग्नीत बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणाली महाविद्यालय / तंत्रनिकेतनांच्या परिसरात स्थापित करणे बंधनकारक असेल. तोपर्यंत दरम्यानच्या कालावधीत संबंधित महाविद्यालये / तंत्रनिकेतने यांनी यापूर्वी स्थापित केलेल्या प्रचलित बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीवर संबंधित विद्यार्थ्यांची नोंदविलेली दैनंदिन शैक्षणिक उपस्थिती विचारात घेण्यात यावी. शैक्षणिक संस्थांमध्ये स्थापित करण्यात येणा-या आधारसंलग्नीत बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीमधील बायोमॅट्रीक उपकरणे STQC (Standardization Testing and Quality Certification) व UIDAI (Unique Identification Authority of India) प्रमाणित असावीत.

५. याप्रमाणे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिष्यवृत्तीची पात्र लाभार्थ्यांना संबंधित शैक्षणिक वर्षाकरिता मंजूर करण्यात येणारी ५० टक्के मर्यादेपर्यंतची शिक्षण शुल्काची रक्कम ही दोन हप्त्यामध्ये लाभार्थी विद्यार्थ्यास देण्यात येईल. त्यापैकी सक्षम प्राधिकाऱ्याकडून पहिला हप्ता

हा संबंधित शैक्षणिक वर्षातील ३१ ऑगस्ट पर्यंत व उर्वरित दुसरा हप्ता ३१ जानेवारी पर्यंत लाभार्थ्यांच्या आधारसंलग्नीत बँक खात्यात जमा करण्यात येईल.

तथापि, उपरोक्त मुदतीपूर्वी महाविद्यालय/ तंत्रनिकेतन यांनी संबंधित विद्यार्थ्याकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतची रक्कम घेऊ नये व विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही याची योग्य ती खात्री शैक्षणिक संस्था करेल. तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांस वरीलप्रमाणे DBT व्दारे प्राप्त होणारी ५०% मर्यादेपर्यंतची शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालय/ तंत्रनिकेतनास शुल्कापोटी तात्काळ अदा करावी व याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित विदयार्थ्याची असेल.

६. महाविद्यालये / तंत्रनिकेतन यांचेकडून इच्छुक अर्जदार विद्यार्थ्यांच्या ऑन-लाईन अर्जाची छाननी करतांना त्या विद्यार्थ्याच्या आधार क्रमांकासह सत्रनिहाय उपस्थितीचा व परीक्षेबाबतचा गोषवारा सादर करणे आवश्यक असेल व याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालय/ तंत्रनिकेतनांच्या प्राचार्यांची असेल. तथापि, प्रथम सत्रामध्ये देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या पहिल्या हप्त्याच्या रकमेसाठी विद्यार्थ्यांची किमान उपस्थिती व परीक्षेबाबतची माहिती विचारात घेण्यात येऊ नये. परंतु त्यापुढील सर्व सत्राकरिता उर्वरित शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यापूर्वी त्या विद्यार्थ्याची लगतपूर्वीच्या सत्रातील आधारसंलग्नीत बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीव्दारे नोंदविलेली किमान ५० टक्के इतकी उपस्थिती व लगतपूर्वीच्या सत्रपरीक्षेस बसत असल्याची खात्री करणे आवश्यक असेल.

७. यापूर्वी संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सदर प्रयोजनार्थ सर्व विद्यापीठे / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ / स्वायत्तता प्राप्त महाविदयालये/तंत्रनिकेतन यांनी प्रत्येक प्रवेशित विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित करताना त्यांचा आधार क्रमांक हा संबंधित विदयापीठ/मंडळाच्या संलग्नीत महाविद्यालय / तंत्रनिकेतनाच्या unique सांकेतिक क्रमांकाशी (AISHE Code अथवा विदयापिठ/मंडळाने दिलेला नोंदणीकृत क्रमांक ) जोडून त्या आधारे विकसित केलेली विद्यार्थ्यांची परिपूर्ण माहिती (Data base) ही प्रस्तावित DBT पोर्टलशी जोडण्यासाठी उपलब्ध करावी.

तसेच विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतन यांचे शिक्षण-शुल्क देखील शुल्क नियामक प्राधिकरणाव्दारे प्रसिध्द करतांना महाविद्यालये / तंत्रनिकेतन यांना संबंधित विद्यापीठाने / महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने / शिखर संथेने (AICTE/COA/PCI) दिलेला unique सांकेतांक क्रमांक महाविद्यालय / तंत्रनिकेतनाचे नाव व संलग्नीत विद्यापीठाच्या नावासह सविस्तर नमूद करावे. तसेच शुल्क नियामक प्राधिकरणाने संबंधित विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतनांकरिता निर्धारीत केलेले शैक्षणिक शुल्क देखील थेट लाभ हस्तांतरण (DBT) पोर्टलशी जोडणे आवश्यक असेल, जेणेकरुन याबाबतची अन्य माहिती देखील DBT पोर्टलवर आपोआप उपलब्ध होऊ शकेल.

याचबरोबर शासकीय / अनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने संदर्भातील शैक्षणिक शुल्काची माहिती ही तंत्र शिक्षण संचालनालयाने महाविद्यालयाच्या युनिक कोडसह (AISHE अथवा विदयापीठ/मंडळाचा नोंदणीकृत क्रमांक) ती DBT पोर्टलला जोडण्याची कार्यवाही करावी.

८. वरील परिच्छेद -३ येथे नमूद केल्याप्रमाणे तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय महाविद्यालये / तंत्रनिकेतनांमध्ये स्थापित करावयाच्या आधारसंलग्नीत बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीकरिता येणारा खर्च हा तंत्र शिक्षण संचालनालयाच्या स्वीय प्रपंजी लेख्यामधून (पीएलए) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९. सदर प्रयोजनार्थ प्रत्येक योजनेकरिता संचालक (तंत्र शिक्षण) यांनी राष्ट्रीयकृत बँकेत एक संयुक्त खाते उघडून त्याव्दारे लाभार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती राज्यस्तरीय डिबीटी पोर्टल मार्फत अदा करण्याची कार्यवाही करावी. वरील नमूद खात्याव्यतिरिक्त इतर कोणतेही खाते (जिल्हा/ तालुका/ विभाग स्तरावर) ठेवण्यात येवू नये.

१०. सदर प्रयोजनार्थ माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून केंद्रीभूत थेट लाभ हस्तांतरण पोर्टल विकसित करण्यात येत असून यासंदर्भात वेळोवेळी मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येईल. या व्यतिरिक्त संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयातील १९ वा परिच्छेद वगळून त्याऐवजी खालील तरतूद लागू राहिल.

"राज्यस्तरीय डिबीटी पोर्टलच्या वापर करुनच अर्ज करण्यापासून ते रक्कम खात्यात जमा करण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया करणे अनिवार्य राहिल."

११. पात्र लाभार्थ्यांना अदा करण्यात येणाऱ्या लाभाच्या रक्कमेची वितरण पध्दतीसंदर्भातील वरील बदल वगळता संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये निर्धारित केलेली अंमलबजावणीची उर्वरित सर्व कार्यपध्दती कायम असतील. त्यानुसार पात्र लाभार्थ्यांनी त्यांचा आधार क्रमांक हा ऑन-लाईन अर्जासोबत देणे आवश्यक असेल. तसेच ज्या बँक खात्यात पात्र लाभार्थ्यांना रक्कम प्राप्त करुन घ्यावयाची आहे, असे खाते ऑन लाईन अर्जासोबत दिलेल्या आधार क्रमांकाशी संलग्न असल्याची खात्री करुन घ्यावी. उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयात नमूद केलेल्या विहित पध्दतीनुसार संबंधित शैक्षणिक संस्थेने व सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्राप्त अर्जाच्या छाननीची प्रक्रिया अवलंबणे आवश्यक असेल.

१२. या योजनेअंतर्गत सध्या लाभ घेत असलेले व नवीन पात्र लाभार्थी यांना यापुढे राज्यस्तरीय डिबीटी पोर्टलवर नव्याने अर्ज करणे अनिवार्य राहिल. तसेच या योजनांतर्गत पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती / निर्वाह भत्ता अदा करतेवेळी प्रत्येक टप्प्यावर अशा लाभार्थी विद्यार्थ्यांची त्याचा अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्थानिहाय सविस्तर यादी संबंधित शैक्षणिक संस्थेस (महाविदयालय/तंत्रनिकेतन) उपलब्ध करुन देण्यात यावी व उपरोक्त परिच्छेद ५ येथे नमूद केल्याप्रमाणे या यादीतील नमूद पात्र लाभार्थी विदयार्थ्यांना महाविदयालय/तंत्रनिकेतनात प्रवेशाच्या वेळी कोणतीही अडचण येणार नाही याची खात्री संबंधित महाविदयालय/तंत्रनिकेतन यांनी घ्यावी. सदरची यादी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही अंमलबजावणी करणा-या विभागाच्या अखत्यारितील संचालनालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्याची असेल. तसेच अभ्यासक्रम व संस्थानिहाय सदर पात्र लाभार्थ्यांची यादी ही संचालनालयाच्या संकेतस्थळावरदेखील न चुकता प्रसिध्द करणे बंधनकारक असेल.

१३. सदर शासन निर्णयानुसार सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी (वैद्यकीय शिक्षण, कृषि आणि पशुसंवर्धन व दुग्ध विकास) त्यांच्या अखत्यारितील निवडक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रतिपूर्ती ऐवजी शिष्यवृत्ती स्वरुपात पात्र विदयार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण करण्यासाठी स्वतंत्रपणे शासन आदेश निर्गमित करावेत.

तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य आणि आदिवासी विकास विभाग देखील त्यांच्या विभागांतर्गत येणाऱ्या सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गातील जे विद्यार्थी या योजनांतर्गत निवडक अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊन संबंधित योजनेच्या अटी व शर्ती पूर्ण करतील अशा पात्र विद्यार्थ्यांना या शासन निर्णयातील पध्दतीचा अवलंब करुन थेट लाभ देण्याबाबतचे स्वतंत्र शासन आदेश निर्गमित करतील .

१४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक २५४/व्यय-५, दि.०४.०३.२०१७ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०४१५१०४८४१७२०८ असा आहे. सदरचा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Dr.Kiran Patil

Digitally signed by Dr.Kiran Patil
Date: 2017.04.15 12:48:10 +05'30'

(डॉ. किरण पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (प.दु.म.), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, सामाजिक न्याय व विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे,
११. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक
१२. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१३. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१४. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१५. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१८. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
१९. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२०. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२२. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
२३. प्रबंधक, सर्व विद्यापिठे
२४. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
२५. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२६. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२८. सर्व जिल्हाधिकारी
२९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३०. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३४. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
३५. उप सचिव (मशि/विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३६. अवर सचिव (तांशि-३/तांशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३७. कक्ष अधिकारी (मशि-२/मशि-४), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३८. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
३९. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
४०. निवड नस्ती/तांशि-४